दि. १५-ऑगस्ट २०२५

प्रेसनोट

"दानात दान सर्वश्रेष्ठ दान- अवयव दान"

अवयवदात्यांच्या कुटुंबियांचा पुणे महानगरपालिका आयुक्तांच्या हस्ते सन्मान

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पुणे महानगरपालिकेच्या प्रांगणात अवयव दात्यांचे नातेवाईक श्री गायकवाड कुटुंबीय,श्री दीधीन पोट्रायील यांचा पुणे महानगरपालिका आयुक्त मा. श्री नवलकिशोर राम यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी श्री. एम. जे. प्रदीप चंद्रन अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल), श्री. ओमप्रकाश दिवटे अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), तसेच सर्व विभाग प्रमुख व अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. याबरोबरच श्री स्वरूप कुलकर्णी, राहुल पाटील, सुप्रिती श्रीवास्तव, सीमा सुधीर पवार यांचा आरोग्य अधिकारी आरोग्य अधिकारी डॉ नीना बोराडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय ,नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनानुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अंगदान जीवन संजीवन अभियान दिनांक ३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान राबवण्यात आले. पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात मरणोत्तर अवयदानास तसेच देहदानास प्रोत्साहन मिळावे व गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्याच्या उद्देशाने हे जनजागरण अभियान राबवण्यात आले. सदर अभियानांतर्गत सार्वजनिक ठिकाणी व कार्यालयामध्ये व्याख्यानांचे आयोजन,पोस्टर प्रदर्शन, प्रतिज्ञा भिंत, वृक्षारोपण, चर्चासत्र, पोस्टर स्पर्धा,रांगोळी स्पर्धा, स्ट्रीट प्ले, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रॅली असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जनजागरणाच्या माध्यमातून विज्ञानाचा दृष्टिकोन स्पष्ट करणे अंधश्रद्धा घालविणे व गरजू रुग्णांना मृत व्यक्तीच्या माध्यमातून जीवनदान देण्याचे यथोचित कार्य होण्यासाठी हे प्रेरणादायी अभियान राबविण्यात येत आहे व त्याचा अतिशय चांगला प्रतिसाद देखील नागरिकांकडून मिळत आहे.

"मरणानंतरही जीवन देऊ शकतो, एवढं महान कार्य आणखी काय असू शकतं? त्यामुळे या दान यज्ञात सर्व नागरिकांनी सहभागी होऊन मरणोत्तर अवयव दानासाठी संकल्प व नाव नोंदणी करावी. यामुळे अनेकांना जीवनदान देण्याचे महान कार्य मृत्यूनंतरही घडणार आहे. या निमित्ताने मी सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना या अमुल्य कार्यात सहभागी होण्यासाठी आवाहन करतो."

-श्री. नवल किशोर राम, महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका

"अवयव दान म्हणजे मृत्यूनंतरही अनेकांना जीवन देण्याची संधी असते आपण सर्वांनी या चळवळीत सहभागी होऊन भारतातल्या अवयव दान दर वाढवण्यास हातभार लावायला हवा. सर्व नागरिकांना विनंतीवजा मी आवाहन करते की, अवयव दानासाठी पुढे या, मरणोत्तर अवयदानासाठी नोंदणी करा. आपल्या मरणोत्तर अवयवदानातून अनेकांना जीवनदान द्या. आपल्या एका निर्णयाने अनेकांना नवीन जीवन मिळू शकते."

-डॉ. नीना बोराडे, आरोग्य अधिकारी पुणे महानगरपालिका

“माझे वडील श्री नरेंद्र कुलकर्णी यांनी पुणे महानगरपालिकेत वीस वर्षे सेवा केली व त्यांनी जोपासलेली सामाजिक जाणीव आम्ही जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी निधन झाले. मरणानंतर आम्ही त्यांच्या अवयव दानाचा निर्णय घेतला. त्या माध्यमातून ज्या गरजू रुग्णांना ते दान मिळाले त्यांच्या समाधानातून आमच्या कुटुंबीयांना देखील समाधान मिळाले आहे व आम्ही आमच्या वडिलांना त्यांच्या रूपात जिवंत पाहत आहोत. मी सगळ्यांना नम्र आवाहन करतो की आपण स्वतः देखील या अवयव दानाच्या कार्यात सहभागी व्हा व इतरांनाही प्रवृत्त करा...”

-श्री स्वरूप कुलकर्णी,पुणे

“माझ्या नातवाचे वयाच्या ९ व्या वर्षी अकस्मात निधन झाले. आम्ही कुटुंबियांनी दुःख सावरत त्याच्या अवयवांचे गरजू रुग्णांना दान दिले. ४ लोकांना त्याच्या माध्यमातून जीवनदान मिळाले. ज्यांना लाभ झाला त्यांच्या आनंदात मी आता समाधान मानते. मी सर्वांना आवाहन करते, तुम्ही पण मरणोत्तर या महान कार्यात सहभागी झालेच पाहिजे यासाठी आपली नोंदणी करून ठेवा”

- सीमा सुधीर पवार (कुमार साईराज ची आजी)

“माझी पत्नी संपदा हिच्या मृत्यूनंतर आम्ही अवयव दानाचा निर्णय घेतला.या निर्णयामुळे सात लोकांना नव्याने आयुष्य मिळाले. हा निर्णय घेण्यासाठी संपदाचे वडील, नामदेव कृष्णा पाटील यांचे वय आज ७२ आहे त्यांनी मला प्रोत्साहित केले व आम्ही कुटुंबियांनी हा अवयव दानाचा निर्णय घेतला.मी तुम्हा सगळ्यांना आवाहन करतो की, अंधश्रद्धा सोडा विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवा मरणानंतर या महादानाचे कार्य करण्यासाठी आपला सहभाग आजच नोंदवा...”

-राहुल निवृत्ती पाटील (संपदाचे पती)

- **कृपया आजच अवयव दान करण्याचा विचार करा, संकल्प करा.**
- **आपल्या कुटुंबीयांशी याबाबत मोकळेपणाने चर्चा करा**
- **NOTTO (**https://www.notto.abdm.gov.in/register**) या संकेतस्थळावर आपली नोंदणी करा.**

अवयव दानाचे महत्त्व

आपल्याला माहित आहे का, भारतात दररोज शेकडो रुग्ण आपल्या अवयवांच्या प्रतीक्षेत आहेत? यामध्ये लहान मुले, तरुण, पालक, आजी-आजोबा हे सर्वच आहेत — जे वेळेवर योग्य अवयव न मिळाल्यामुळे जीवनाची लढाई हरतात. एकच अवयव दान केले तरी कोणाच्या तरी आयुष्याला आशेचा किरण मिळू शकतो. मृत्यूनंतरही आपण अनेकांना जीवन देऊ शकतो – हे आपल्या हातात आहे. आपल्या जबाबदार नागरिक म्हणून आपण ही भूमिका पार पाडूया. अवयव दान ही केवळ वैद्यकीय गरज नाही, तर ती मानवतेची पुकार आहे. भारतामध्ये दरवर्षी हजारो रुग्ण यकृत, हृदय, मूत्रपिंड, फुफ्फुसे यांसारख्या अवयवांच्या प्रतिक्षेत असतात. यापैकी अनेक रुग्ण वेळेवर योग्य अवयव न मिळाल्यामुळे जीव गमावतात. अवयव दान हे अशा रुग्णांसाठी जीवनदायी ठरते.

एकच व्यक्ती मृत्यूनंतर ८-९ रुग्णांचे प्राण वाचवू शकते.

कोणते अवयव आणि ऊतक दान करता येतात?

जिवंत व्यक्ती कडून (Living Donation):

- मूत्रपिंड (Kidney)
- यकृताचा भाग (Part of Liver)
- फुफ्फुसाचा एक भाग (in rare cases)

ब्रेन डेड किंवा मृत व्यक्तीकडून (Deceased Donation):

- हृदय
- फुफ्फुसे
- यकृत
- मूत्रपिंड
- अग्न्याशय
- डोळे (कॉर्निया)
- त्वचा
- हाडे
- अंत्र (Intestines)
- रक्तवाहिन्या, हृदयाचे झिल्ली (Heart Valves)

कोण अवयव दान करू शकतो?

- **वय:** १८ वर्षांपेक्षा जास्त वयाची कोणतीही मानसिकदृष्ट्या सक्षम व्यक्ती
- **जिवंत दान:** सामान्य आरोग्य असलेल्या कुटुंबातील सदस्य किंवा संबंधित व्यक्ती
- **मृत दान:** ब्रेन डेड घोषित केलेल्या व्यक्तीचे अवयव वैद्यकीय तपासणीने योग्य ठरल्यास दान करता येतात
- **डोळे आणि काही ऊतक (Tissue) नैसर्गिक मृत्यूनंतरही दान करता येतात**

कोण अवयव दान करू शकत नाही?

- एचआयव्ही / हिपॅटायटीस बी/सी पॉझिटिव्ह रुग्ण (काही अपवाद वगळता)
- कर्करोगाने ग्रस्त व्यक्ती (विशिष्ट प्रकार व स्टेजनुसार)
- गंभीर संसर्ग (सेप्सिस)
- रोगप्रतिकारशक्ती कमी असणारे काही रोग
- वैद्यकीयदृष्ट्या अवयव दान अयोग्य ठरवलेली स्थिती

नोंदणी व अधिकृत संस्था

NOTTO (National Organ & Tissue Transplant Organization):

- भारतातील राष्ट्रीय संस्था
- संकेतस्थळ: https://www.notto.mohfw.gov.in

SOTTO (State Organ and Tissue Transplant Organization):

- राज्य पातळीवर अवयव दानाचा समन्वय करते
- महाराष्ट्रासाठी: SOTTO-Maharashtra, JJ Hospital, मुंबई

ROTTO (Regional Organ and Tissue Transplant Organization):

- क्षेत्रीय पातळीवरील संस्थान

सरकारमार्फत मोफत सेवा व सुविधा

NOTP अंतर्गत सरकार खालील सेवा मोफत पुरवते:

- ब्रेन डेड रुग्णासाठी आवश्यक तपासण्या
- अवयव काढण्याची व प्रत्यारोपणाची प्रक्रिया
- अवयव वाहतूक (ग्रीन कॉरिडोर)
- गरजू रुग्णांना आर्थिक मदत (BPL/इतर श्रेणींमध्ये)



अवयव दाते श्री.दिनेश पोट्रायील यांचे वतीने त्यांचा मुलगा श्री दीधीन पोट्रायील यांचा पुणे महानगरपालिका आयुक्त मा. श्री नवलकिशोर राम यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना .



अवयव दाते कुमार साईराज पवार यांचे वतीने त्यांचे कुटुंबीय व आजी श्रीमती सीमा सुधीर पवार यांचा आरोग्य अधिकारी डॉ नीना बोराडे यांच्या हस्ते सत्कार.



अवयव दाते संपदा राहुल पाटील यांचे वतीने त्यांचे पती राहुल पाटील यांचा आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोराडे यांच्या हस्ते सत्कार.



अवयव दाते नरेंद वसंत कुलकर्णी यांचे वतीने त्यांचा मुलगा स्वरूप कुलकर्णी यांचा आरोग्य अधिकारी डॉ नीना बोराडे यांच्या हस्ते सत्कार.



अवयव दाते श्री. विकास श्रीवास्तव यांचे वतीने त्यांचे पत्नी सुप्रिती श्रीवास्तव व मुलगी डॉ. दिव्या श्रीवास्तव व यांचा आरोग्य अधिकारी डॉ नीना बोराडे यांच्या हस्ते सत्कार.